# व्यवस्थापन

सादरकर्ते-
गायकवाड ज्योती सुरज
सहा.प्राध्यापक
वाणिज्य विभाग

# व्यवस्थापन

व्यवसाय-संघटनेमध्ये उपयोगात येणाऱ्या साधनसामग्रीचे आणि व्यक्तींचे नियंत्रण करणारी व पूर्वनियोजित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी योजिलेली सुविहित यंत्रणा म्हणजे व्यवस्थापन होय. उत्पादनघटकांना संघटित व दिग्दर्शित करून त्यांच्यापासून संपत्ती निर्माण करण्याचे काम व्यवस्थापनाचे असते.

व्यवसाय व्यवस्थापनात कर्मचारी-निवड, प्रशिक्षण, निरीक्षण आणि मनुष्यबळविकास यांचाही अंतर्भाव होतो. व्यवसाय प्रशासन ही वेगळी संकल्पना असून तो व्यवस्थापनाचाच एक भाग मानला जातो; परंतु काही व्यवस्थापनतज्ज्ञांच्या मते व्यवस्थापन व प्रशासन या संकल्पनांमध्ये निश्चित फरक आहे. ऑलिव्हर शेल्डन या ब्रिटिश व्यवस्थापनतज्ज्ञाच्या मते उद्योगामध्ये प्रशासनाचे कार्य व्यवसाय संघटनेची धोरणे निश्चित करणे; वित्त, उत्पादन व वितरण यांमध्ये समन्वय प्रस्थापित करणे; संघटनेचे क्षेत्र निश्चित करणे आणि संघटनेचे उद्दिष्ट साध्य करण्याकरिता निर्माण केलेल्या यंत्रणेवर नियंत्रण ठेवणे हे असते

# वैशिष्ट्ये

- व्यवस्थापन ही कला आहे
- व्यवस्थापन हे एक शास्त्र आहे
- व्यवस्थापनासाठी सर्वांगीण ज्ञानाची आवश्यकता असते
- व्यवस्थापन म्हणजे इतरांकडून काम करून घेणे
- व्यवस्थापनाची व्याप्ती अधिक आहे
- व्यवस्थापन ही एक प्रक्रिया आहे
- व्यवस्थापन हे एक सामुहिक कार्य आहे
- व्यवस्थापन चांगल्या कामाचे फळ आहे

# व्यवस्थापनाची वैशिष्ट्ये

- **व्यवस्थापन ही कला आहे**

व्यवस्थापक है अनेक व्यक्तिकडून काम करून घेतात. त्यासाठी आपल्याजवळील कौशल्याचा वापर करतात म्हणूनच व्यवस्थापक यशस्वी होतात. व्यवस्थापकांच्या अंगी निर्णयक्ती असते. त्याद्वारे ते व्यवसायातील कामे करून घेतात. निर्धनशक्तीद्वारे ते व्यवसायातील अवघड आणि गुंतागुंतीच्या समस्या सोडवितात व्यवस्थापकांच्या निर्णयामध्ये ताकद असते. तसेच जादू असते..

- **व्यवस्थापन हे एक शास्त्र आहे**

व्यवस्थापन ज्ञानाधिष्ठीत आहे. व्यवस्थापनामध्ये सिद्धांताची मांडणी केलेली असते. शास्त्रीय कसोटांच्या आधारावर विश्लेषण करून ज्ञान संपादन केलेले असते. ज्ञानामध्ये तर्क संगत आणि सातत्य असते. अचूकतेकडे जाणे सोईचे जाते. शास्त्रीय कसोट्यांवर लोकांचा विश्वास बसतो

- **व्यवस्थापनासाठी सर्वांगीण ज्ञानाची आवश्यकता असते**

त्यासाठी शैक्षणिक व्यवसायिक पात्रता असावी लागते किंवा विशिष्ट कौशल्य धारण करण्यासाठी प्रशिक्षण घ्यावे लागते. इतर उत्पादन करणाऱ्या व्यवसायापेक्षा व्यवस्थापनाचे स्वरूप भिन्न आहे. उदा. शिक्षक, डॉक्टर, वकील इंजिनिअर, हिशेब तपासणीस इ. चा समावेश पेशामध्ये केला जातो. व्यवस्थापन अशाच प्रकारचे आहे. डॉक्टर किंवा वकीलांसारखा व्यवस्थापकांना फार मान सन्मान आणि किंमत असते.

- **व्यवस्थापन म्हणजे इतरांकडून काम करून घेणे:**

व्यवसायामध्ये अनेक लोक काम करत असतात. व्यवसायातील अधिकारी आणि असंख्य कर्मचारी इ. कडून व्यवस्थापकांना कामे करून घ्यायची असतात. व्यवसायातील विविध अधिकारी आणि कर्मचारी इ. च्या सहाय्याने व्यवस्थापक  व्यवसायातील विविध कार्ये पार पाडतात व्यवसायातील विविध अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना समजावून घेणे, सल्ला देणे, कर्मचाऱ्यांमध्ये सहकार्याची भावना निर्माण केली जाते.

- **व्यवस्थापनाची व्याप्ती अधिक आहे**

व्यवस्थापनाची व्याप्ती आहे विविध प्रकारच्या व्यवस्थापनाचा अवलंब केला जातो. उदा. शैक्षणिक, क्रीडा, कारखानदारी, संरक्षण, आरोग्य, राजकारण, सहकार, धर्मदाय संस्था, वाहतूक वळण, करमणूक, विमा, बँकिंग, जाहिरात संशोधन इ. आधुनिक बाजारपेठे विविध क्षेत्रामध्ये व्यवस्थापनाचा समावेश करण्यात आला आहे.

- **व्यवस्थापन ही एक प्रक्रिया आहे**

व्यवस्थापनामध्ये व्यवस्थापन करावयाच्या विविध कार्याचा समावेश केला जातो. नियोजन, संघटन, समन्वय, नियंत्रण, कर्मचारी विकास, अभिप्रेरणा इ. महत्त्वाच्या कार्याचा त्यामध्ये समावेश केला जातो.

- **व्यवस्थापन हे एक सामुहिक कार्य आहे**

व्यवसाय संघटना ही समूहाद्वारे निर्माण झालेली असते. सामुहिक प्रयत्नाने आणि सहकार्याने व्यवसायाची उदिष्टे पूर्ण केली जातात. प्रत्येक व्यक्तिचे कार्य स्वतंत्र परंतु भिन्न असले तरी ती एक सामूहिक गजल जाते. सामुहिक प्रयत्नाशिवाय संघटनेला यह प्राप्त होत नाही व्यक्तिगत पातळीवर प्रयत्न फार अपुरे पडतात.

- **व्यवस्थापन चांगल्या कामाचे फळ आहे**

व्यवस्थापनाचा दृष्टिकोन नेहमी चांगला असतो. व्यवस्थापक हे सातत्याने व्यवसायाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून ध्येय व धोरणे ठरवित असतात. व्यवसायाची कार्यक्षमता वाढवून अधिक नफा मिळवला जातो. त्याद्वारे विविध घटकांना योग्य मोबदला दिला जातो. व्यवसायाचा विकास साधला जातो.

# कार्य

- नियोजन
- संघटन
- नियुक्ती
- नियंत्रण

# व्यवस्थापनाची कार्य

- नियोजन :व्यवस्थापन भविष्यातील गरजांचा अंदाज घेते जेणेकरुन निर्धारित उद्दिष्टे लक्षात घेऊन केलेले सध्याचे प्रयत्न त्यांच्या अनुरुप करता येतील. नियोजन म्हणजे काय करावे, का करावे, कुठे करावे, केव्हा करावे, कसे करावे आणि कोणाकडून करायचे, या सर्व गोष्टींकडे लक्ष द्या. यासोबतच प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जाण्याचे मार्गही नियोजनाअंतर्गत विचारात घेतले जातात.

- संघटन :- नियोजन करून उद्दिष्टे आणि उद्दिष्टे ठरवल्यानंतर त्यांची अंमलबजावणी करण्याची समस्या येते, जी संस्थेमार्फत व्यवस्थापनाकडून केली जाते. संस्था ही निर्धारित उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी एक यंत्रणा आहे. एंटरप्राइझच्या योजना कितीही चांगल्या आणि आकर्षक असल्या तरीही, चांगल्या संघटनेचा अभाव असल्यास, यशाची इच्छा व्यर्थ ठरेल.

- **नियुक्ती :-** व्यवस्थापनाचे प्राथमिक कार्य म्हणजे कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करणे, म्हणजे – संस्थेच्या योजनेनुसार आवश्यक अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे, त्यांना आवश्यक प्रशिक्षण देणे.
- **दिग्दर्शन(Directing) :-** व्यवस्थापन ही मुळात लोकांना गोष्टी करायला लावण्याची कला आहे. व्यवस्थापनाचे चौथे महत्त्वाचे कार्य म्हणजे एंटरप्राइझला दिशा किंवा दिशा देणे. दिग्दर्शन म्हणजे – संस्थेतील विविध नियुक्त व्यक्तींना काय करावे, ते कसे करावे, केव्हा करावे हे सांगणे आणि त्या व्यक्ती त्याच पद्धतीने त्यांचे काम करत आहेत की नाही हे पाहणे. दिग्दर्शन हे व्यवस्थापनाचे महत्त्वाचे कार्य आहे जे संघटित प्रयत्नांना सुरुवात करते.

- **नियंत्रण :-** नियंत्रण म्हणजे केवळ केलेल्या कामाची तपासणी करणे असा होत नाही, तर अशा उपाययोजना करणे जेणेकरुन एंटरप्राइझचा व्यवसाय निश्चित योजनांनुसार चालवला जाऊ शकेल आणि निश्चित उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी आणि त्यात काही फरक असल्यास सुधारात्मक पावले उचलता येतील. घेतले. नियंत्रण हा व्यवस्थापनाचा एक भाग आहे.

# महत्त्व

- व्यवसाय संघटनेच्या नावलौकिकामध्ये वाढ होते
- कर्मचाऱ्यांमध्ये एकसंघ भावना निर्माण होते
- कर्मचाऱ्यांना प्रेरणा देता येते
- कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढते
- साधनसामग्रीचा पुरेपूर वापर केला जातो
- आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करता येतो
- स्पर्धेमध्ये टिकून राहता येते
- व्यवसायाचा विकास करता येतो

# व्यवस्थापनाचे **महत्त्व**

- **व्यवसाय संघटनेच्या नावलौकिकामध्ये वाढ होते -**

ज्या व्यवसायामध्ये चांगल्या व्यवस्थापनाचा अवलंब केला जातो. अशा व्यवसायातील एकूण कामकाजामध्ये सुधारणा होते जसे की, दर्जेदार मालाची निर्मिती करणे, कामगारांना विविध सुविधांचा लाभ देणे, शासनाकडे करांचा भरणा वेळेवर करणे, सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग घेणे इ. मुळे व्यवसायाचे नावलौकिक सुधारते, तसेच व्यवसायाची समाजातील प्रतिमा विकसित होते.

भागधारकांना योग्य दराने लाभांशाचे वितरण, ग्राहकांना वाजवी दराने वस्तू आणि सेवांचा पुरवठा अशा बाबी व्यवस्थापनाचा सामाजिक दृष्टिकोन चांगला असण्याचे द्योतक आहे.

- **कर्मचाऱ्यांमध्ये एकसंघ भावना निर्माण होते:**

कर्मचाऱ्यामध्ये एकजूट निर्माण करणे हे व्यवस्थानावर अवलंबून आहे. अधिकारी आणि कर्मचारी यामध्ये एकसंघ भावना वाढीस लागण्यास अधिकाऱ्यांना कर्मचाऱ्यांकडून काम करून घेणे सोईचे जाते त्यांच्यामध्ये आपुलकी, समन्वय आणि सहकार्य वृत्ती वाढीस लागते. प्रत्येक कामामध्ये व्यक्तिचा हातभार असणे गरजेचे आहे.

- **कर्मचाऱ्यांना प्रेरणा देता येते**

कर्मचाऱ्यांना कामामध्ये प्रोत्साहन देणे हे व्यवस्थापनाचे काम आहे. चांगल्या कामाबाबत शाबासकी आणि सदोष कामाध्ये मार्गदर्शन अशा प्रकारची व्यवस्थापकांची भूमिका असावी लागते. कर्मचाऱ्यांना प्रेरणा दिल्यामुळे त्यांचा उत्साह व कार्यक्षमता वाढते.

- **कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढते**

व्यवस्थापक कामाच्या ठिकाणी चांगल्या वातावरणाची निर्मिती करतात. कर्मचाऱ्यांना आवश्यक या सुविधा उपलब्ध करून देतात. कर्मचाऱ्यांना आर्थिक आणि आर्थिकेत्तर प्रेरणा देतात. कामाचा दर्जा आणि कार्यक्षमतेतील वाढ यावर आधारित शास्त्रीय व्यवस्थापनामध्ये वेतन देण्याची पद्धत आहे. आर्थिक लाभ अधिक मिळावा या हेतूने कर्मचारी अधिक कार्यक्षमतेने काम करतात. त्यामुळे व्यवसायाची कार्यक्षमता वाढते.

- **साधनसामग्रीचा पुरेपूर वापर केला जातो**

व्यवसायाला लागणारी सामग्री व्यवस्थापक प्रमाणानुसार खरेदी करतात. कर्मचाऱ्यांना सामग्री हाताळणी आणि वापर याबाबतचे प्रशिक्षण दिले जाते. सामग्रीचा अपव्यय होणार नाही, याची दखल घेतली जाते. व्यवस्थापक कर्मचाऱ्यांना आदेश, सूचना, मार्गदर्शन करून साधन सामग्रीचा पुरेपूर वापर करण्यासाठी त्यावर नियंत्रण ठेवतात.

- **आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करता येतो**

व्यवस्थापनाचा दृष्टिकोन विकसित असल्यामुळे उत्पादनाचा दर्जा विकसित करणे, पर्यावरणामध्ये उपयुक्त बदल करणे. नवीन उत्पादनाचा शोध घेणे, नवीन उत्पादन पद्धतीचा अवलंब करणे याबाबत संशोधन करून बाजारामध्ये नवीन तंत्रज्ञान उपलब्ध झाल्यास त्याचा व्यवसायामध्ये अवलंब करणे याबाबत व्यवस्थापक सातत्याने विचार करत असतात त्यामुळे उत्पादनाचा दर्जा | विकसित करणे, उत्पादन खर्चामध्ये बचत करणे याबाबी व्यवसायाच्या दृष्टिने सोईच्या जातात. उदा. संगणकीकरण, स्वयंचलीकरणाचा अवलंब करणे इ.

- **स्पर्धेमध्ये टिकून राहता येते**

सध्याचे युग हे स्पर्धेचे असल्यामुळे व्यावसायिकाला स्पर्धेचा विचार करावा लागतो. स्पर्धकांच्या उत्पादनाचाडचांचा विचार करून आपल्याला स्पर्धेमध्ये प्रवेश करण्यासाठी व प्रचंड स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी काय केले पाहिजे हे व्यवस्थापक तरवित असतात.

- **व्यवसायाचा विकास करता येतो**

व्यवस्थापक है व्यवसायाची वाढ व वृद्धी व्हावी या हेतूने धोरणे ठरविणे व त्यांची अंमलबजावणी करणे हे काम करता असतात. त्यांच्या डोळ्यासमोर सतत नवीन योजना व भविष्यकाळामध्ये व्यवसायाचा अपेक्षित विकास कसा होईल असा डोळस दृष्टिकोन असतो व्यवस्थापनामध्ये येणाऱ्या अडचणीवर ते अभ्यास करतात, व्यवसाय विकासासाठी नवीन आव्हाने स्वीकारण्याची त्यांची तयारी असते.

# आभार